Exh.15/D

रे क नंबर ५८/२०२६

मे दिवाणी न्यायाधीशसो कनिष्ठ स्तर गारगोटी

यांचे कोर्टात

श्री महिपती रामचंद्र पाटील वादी

विरुद्ध

आदिनाथ महादेव पाटील वगैरे प्रतिवादी

दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे जैसे थे परिस्थिती ठेवण्यासाठी अर्ज

यातील वादी तरफे विनंती अर्ज की

Order

O.S. to say.

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2026.06.24 15:22:45 +0530

१) यातील वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुद्ध कायम मनाई साठी दावा दाखल केलेला आहे प्रस्तुतचा दावा व तुर्तातूर्त मनाई अर्जाचे समन्स व नोटीस प्रतिवादी यांना लागू झालेले आहे. प्रतिवादी हे मे कोर्टामध्ये हजर झालेले आहेत व म्हणणे देण्यासाठी मुदत मागितलेली आहे

२) प्रतिवादी हे कैफियत व म्हणणे देण्यासाठी मुदत घेऊन काम चालवण्यास टाळाटाळ करून बांधकाम पूर्ण करून घेण्याच्या तयारीत आहेत.

३) प्रतिवादी हे पैशाचा व मनुष्यबळाचा वापर करून वादी यांची दावा मिळकत हडप करण्यासाठी बांधकाम पूर्ण करण्याच्या तयारीत आहेत त्यामुळे

Asstt. Supdt.

प्रतिवादी यांनी आपली कैफियत व म्हणणे देई तोपर्यंत दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम करू नये म्हणून जैसे थे परिस्थितीचा आदेश होवून मिळणेसाठी वादी हे प्रस्तुतचा अर्ज दाखल करत आहेत त्यामुळे वादी यांचा अर्ज मंजूर करण्यात यावा त्याची संयुक्तिक कारणे खालील प्रमाणे

१) वादी यांनी मे कोर्टांचे पासून कोणतीही वस्तुस्थिती लपवून ठेवलेली नाही.

२) प्रस्तुत चा अर्ज मंजूर केलेस यातील प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही उलट नामंजूर झालेस वादी यांना त्यांचे दावा मिळकतीस व त्यांचे न्याय हक्कास मुकावे लागणार आहे व वादी यांचे कधीही भरून न येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे.

३) वादी हे जैसे थे चा आदेश घेऊन काम चालवण्यास टाळाटाळ करणार नाहीत अथवा तूर्तातूर्त मनाई अर्जाचे कामी युक्तिवाद करणेस कोणतीही मुदत मागणार नाहीत

४) .येणेप्रमाणे वर नमूद कारणांचा विचार करून प्रतिवादी यांनी आपली कैफियत व म्हणणे दाखल करे तोपर्यंत दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम करू नये म्हणून जैसे थे चा आदेश होऊन मिळावा ही नम्र विनंती.

येणे प्रमाणे अर्ज असे

**गारगोटी**

**दिनांक २४/०६/२०२६**

Asstt. Supdt.

**प्रतिज्ञा**

मी वादी सत्य प्रतिज्ञा करतो की. वर नमूद दावेतील मधील सर्व मजकूर माझ्या माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली सत्य प्रतिज्ञा आज मुक्काम गारगोटी तारीख **दिनांक २४/०६/२०२६**

वादी

**श्री माहीपती रामचंद्र पाटील**

**ॲफिडेव्हिट**

मी **वादी श्री माहीपती रामचंद्र पाटील व व ५० धंदा शेती ,रा-मुदाळ ता भुदरगड जि कोल्हापूर** देवाचे शपथेवर ॲफिडेव्हिट करतो की वर नमूद दावेतील सर्व मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हिट आज मुक्काम गारगोटी **दिनांक २४/०६/२०२६**

I know the deponent

wu to plaintiff

वादी

**श्री माहीपती रामचंद्र पाटील**

Asstt. Supdt.

## प्रतिज्ञा

मी वादी सत्य प्रतिज्ञा करतो की. वर नमूद प्रतिज्ञ व ऑफिडेव्हिट मधील सर्व मजकूर माझ्या माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली सत्य प्रतिज्ञा आज मुक्काम गारगोटी तारीख **दिनांक २४/०६/२०२६**

**वादी**

**श्री माहीपती रामचंद्र पाटील**

Solemnly Affirmed before me by
Shri. Mahipati Ramchandra Patil age 50
of R/o. Mudal Tal. Bhudargad Kop
who is identified by
Shri. Adv. R. A. Naik
whom I know personally
Date- 24/6/26

**Asstt. Supdt.**